# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २४ सप्टेंबर/२०२३ (रविवार)

---

## चारीत्र्यावर संशय घेवुन पत्नीचा केला खुन

**पोलीस स्टेशन खापरखेडा :–** अंतर्गत मौजा वार्ड क्र. ०१ भानेगाव, ०२ किमी, पूर्व. येथे यातील आरोपी हा आपली पत्नी नामे– सौ. रंजना मनोहर मनगटे वय ४५ वर्ष हीचे चारित्र्यावर नेहमी संशय घेण्याच्या स्वभावाचा असून तो याच कारणावरून वादविवाद करून पत्नीला मारहाण करीत होता. दिनांक २३/०९/२३ चे १५/४५ ते १६/१२ वा. दरम्यान. यातील आरोपी यांने घरी कोणी नसतांनी आपल्या पत्नीचे चारित्रावर संशय घेऊन तिचा नायलॉन दोरीने गळा आवळून खून केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आनंद मनोहर मनगटे वय २५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ भानेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर, यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी नामे– मनोहर काशिनाथ मनगटे वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ भानेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर. याचेविरूध्द कलम ३०२ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास – पोलीस उपनिरीक्षक श्री सुर्यप्रकाश मिश्रा मो क्र ९५११२९०३४९ हे करीत आहे.

## जबरी संभोग करणारा आरोपी अटकेत

**पोलीस स्टेशन नरखेड :–** अंतर्गत तिनखेडा ता नरखेड १० किमी दक्षिण. यातील आरोपी नामे गजा काशीराम रेवतकर हा फिर्यादीचा नातेवाईक असून यातील पिडीता फिर्यादी ही मूकबधीर कर्णबधीर असल्याचे माहीत असून तीचे घरी जावून दरवाजा बंद करुन तीचे तोंड दाबून जबरी संभोग केला व "घडलेला प्रकार कोणालाही सांगू नको, नाहीतर तूझ्या नवऱ्याला मारून टाकीन " अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी पिडीता यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी नामे गजा काशीराम रेवतकर यांचे विरूध्द कलम ३७६ (२) (स), ५०६ भा.द.वी अन्वये गुन्हा नोंद करून सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास मपोउपनि सारीका गूरुकर मॅडम पोस्टे नरखेड मो.नं ९६६५८३४९९९ हे करीत आहे.

## विनयभंग करणारा आरोपी विरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** अंतर्गत मौजा कळमेश्वर बंजारा माता मंदीर १ किमी पुर्व. यातील पिडीता वय २० वर्ष हीचा यातील आरोपीने पाठलाग करून रस्त्यात अडवुन शरीर सुखाची मागनी करून, हात धरून **विनयभंग** केला व "जर तु लग्न केले नाही, तर तुला व तुझे आईला मारून टाकीन, अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी पिडीता हीचे रिपोर्टवरुन आरोपी नामे– चेतन अशोकरावजी नागपुरे वय २८ वर्ष रा. उबगी तह कळमेश्वर याचे विरूध्द पोस्टे कळमेश्वर येथे कलम ३५४(अ),(ड),३४१,५०४,५०६ भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास – पो हवा दयाराम करपाते पोस्टे कळमेश्वर मो नं. ९९६०६८२४७८ हे करीत आहे.

## एटीएम गॅस कटरने कापुन चोरी

**पोलीस स्टेशन बोरी** :—अंतर्गत मौजा बुट्टीबोरी ICICI बॅक चS ATM १ किमी. दक्षिण. येथे दिनांक २३/०९/२३ चे ०२.३० वा ते ०२.४५ वा. सुमारास एफएसएस कंपनीचे मॅनेजर निलेया गावंडे यांनी त्यांचे मोबाईल फोनवर फोन करून सांगितले की, बुट्टीबोरी येथील आयसीआयसीआय बॅकेचे एटीएम मध्ये चोरी झाली आहे, असे सांगितले वरून फिर्यादी बुट्टीबोरी येथे येवून नमुद बॅकेचे एटीएम मशीनची पाहणी करीता गेले असता, सदर एटीएम मशीनचे समोरील डिस्पेन्सर डोअर व वॉल्ट गॅस कटरने कापलेले दिसले, व त्यामध्ये पैसे ठेवण्याकरीता असलेले ०४ कॅसेट सेट दिसून आले नाही. त्यावरून फिर्यादीने मुंबई येथील FSS कॅश टिम कडून बॅलन्सबाबत ईमेल व्दारे माहीती घेतली असता एटीएम मशीन मध्ये १००, २०० व ५००/— रू च्या नोटा असलेल्या एकुण १४,९५,२००/— रू. असल्याचे समजले. व सदरची रक्कम व ०४ कॅसेट कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सुमीत रामेश्वर महल्ले वय ३६ वर्षे रा प्लॉट नं. ३१ प्रगती नगर जयताळा रोड नागपूर मो.क्र. ७३८५३२६९२५ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५७ ३८०, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— तपास सपोनि साखरकर मो.क्र. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## आत्महत्या

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— अंतर्गत मौजा जलालखेडा वार्ड क्र. ०१. येथे यातील फिर्यादीचा मुलगा नामे मृतक नामे विशाल रामेश्वर रेवतकर वय २६ वर्ष रा. जलालखेडा वार्ड क्र. ०१ ता. नरखेड हा चार ते पाच वर्षा पासुन मनोरूग्न असल्याने मृतक याने घराचे आतमधुन दरवाजा लावुन गळ्याला दुप्पटा बांधुन गळा आवरून मृत्यु पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रंजना रामेश्वर रेवतकर वय ५५ वर्ष रा. जलालखेडा वार्ड क्र.०१ ता. नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पोना प्रकाश ठोके पो स्टे जलालखेडा हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**